दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

SAMARTH RAJYOG

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१३१ गुरुवार,दि.१६ जानेवारी २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-131 Thursday, Dt.16 January 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4


## वाल्मिक कराड यांच्या समर्थनार्थ आज शिरूर बंद

मानूर ।प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते वाल्मीक कराड यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केल्यामुळे कराड समर्थकांच्या वतीने आज गुरूवार रोजी शिरूर शहर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.वाल्मीक कराड यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा केवळ राजकीय द्वेशापोटी करण्यात आला असून त्यांना आणि वंजारी समाजाला बदनाम करण्याच्या उद्देशाने दोन समाजात तेढ निर्माण करण्यात आला आहे.या संदर्भातील निवेदन सहपोलीस निरीक्षक यांना वाल्मीक कराड समर्थक बाळू गर्जे,संतोष केदार,विकास केदार,अजय केदार,रामेश्वर नागरगोजे,सतिश गर्जे यांनी दिले आहे.

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड यांना ७ दिवसाची पोलीस कोठडी

## बीड जिल्हा न्यायालयाच्या आवारातच कराड आणि मयत देशमुख समर्थकांची प्रचंड घोषणाबाजी, पोलिसांची वकिलांनाही अरेरावी !

बीड /प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्याप्रकरणी आरोपी वाल्मीक कराडला बीड जिल्हा मोका कोर्टाच्या विशेष न्यायाधीश सुनीता देशमुख यांनी सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.कराड यांना पोलीस कोठडी सुनावण्यात येताच कराड समर्थक न्याय द्या न्याय द्या म्हणत आक्रमक झाली.तर दुसरीकडे शरद पवारांची राष्ट्रवादी आणि शिवसंग्रामचे पदाधिकारी मयत देशमुख कुटुंबियांच्या बाजूने घोषणा बाजी करत आक्रमक झाली.त्यामुळे पोलिसांना सोम्य लाठीचार्च करावा लागला.वकीलांना एकेरी आणि अरेरावीची भाषा पोलिसांना

सुरुवातीला वाल्मिक कराड यांना केवळ खंडणी प्रकरणी आरोपी करण्यात आलं होतं. मात्र, काल याच प्रकरणी जेव्हा त्यांना न्यायालयीन कोठडी मिळाल्या नंतर तात्काळ एस आय टी ने वाल्मिकला खुनाच्या गुन्ह्यात आरोपी बनवून त्याच्यावर मकोका लावला. त्यामुळे आज दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी कोठडी मिळविण्यासाठी डखढ ने त्याला कोर्टात हजर केलं होतं.

बीड कोर्टात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर गुन्हे दाखल

मकोका गुन्ह्यातील आरोपीस आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालयतील विशेष मकोका कोर्टात हजर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने बोड जिल्हा न्यायालय परीसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला होता. आरोपीस कोर्टात हजर केल्यानंतर पोलीस वाहनांतून १६.४० ते १७.०० वा. दरम्यान परत बाहेर घेवून जात असताना बीड कोर्टाचे परीसरात १) सुनिल श्रीरंग फड वय ५० वर्षे, रा. परळी वैजीनाथ, ता. परळी जिल्हा बीड २) ज्ञानोबा दगडू मुंडे वय ३६ वर्षे.रा. उखळी ता. गंगाखेड, जिल्हा परभणी, ३) जिवन माणिक कराड वय ३० वर्षे रा. पिराचीवाडी ता. केज, जि. बीड व इतर अनोळखी ३० ते ३५ यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन वाल्मीक कराड यांच्या वरील खोटा गुन्हा मागे घ्यावा अशी घोषणाबाजी करुन जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याबाबत विलास श्रीमंतराव मोरे वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं.२९/२०२५ बी.एन.एस.एस. कलम १३२, २२१, १८९ (२), १८९(३), १९१(२). १९० सह म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून तपास चालु आहे.

तसेच बीड कोर्टाचे परीसरात १) हेमा श्रीहरी लोमटे (पिंपळे) रा. स्वराज्य नगर, बोड २) मनिषा गंगाधर कुपकर रा. अंबीका नगर, बीड ३) संगीता कोकाटे व इतर १० ते १२ महीला यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन संतोष देशमुख यांचे मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहीजे अशी घोषणाबाजी करुन सरकारी कामात अडथळा

(उर्वरीत पान २ वर)



### हत्येच्या दिवशी वाल्मिक कराडने संतोष देशमुख यांना धकमी दिली होती – दावा

दरम्यान, या प्रकरणी डखढ एक अत्यंत धक्कादायक आरोपही वाल्मिक कराडवर लावला आहे. ज्याबाबत कोर्टात माहिती देताना सरकारी वकिलांनी सांगितलं की, 'हत्या प्रकरणातील अनेक आरोपी सराईत गुन्हेगार आहे. ते एकमेकांना ओळखतात. सर्वांनी एकत्रित येऊन आणि एकमेकांच्या संपर्कात राहून खंडणी सारखे गुन्हे केले.''दरम्यान, संतोष देशमुख यांची हत्या झाली त्याच दिवशी वाल्मिक कराडने संतोष देशमुख यांना धमकी दिली होती.' असा दावा एसआयटीकडून कोर्टात करण्यात आला आहे.

### न्यायालयाच्या बाहेर महिला वकिलांसह राष्ट्रवादीचा राडा

आरोपी वाल्मीक कराड यांना न्यायालयीन प्रक्रिया पार पडल्यानंतर पोलीस व्हॅन मधून बाहेर घेऊन जात असताना बीड जिल्हा न्यायालयातील विधीज्ञ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अँड हेमाताई पिंपळे यांच्यासह इतर महिलांनी वाल्मीक कराडसह संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. यामुळे काही तणाव निर्माण झाला होता.

### वाल्मिक कराडवर मकोका का लावण्यात आला ?

वाल्मिक कराडवर नेमका मकोका का लावण्यात आला याची माहितीही सरकारी वकिलांच्या वतीने कोर्टात देण्यात आली आहे. वाल्मिक कराड याच्यावर जे गुन्हे दाखल झाले होते त्याची यादीच सरकारी वकिलांनी कोर्टासमोर सादर केली आहे.

चउजउ- का आणि कसा लावण्यात आला यासाठी हे पुरावे एस आय टी कडून देण्यात आले आहेत.

### परळीत तणावपूर्ण शांतता...

परळी मतदारसंघात वाल्मीक कराड समर्थकांनी ठिय्या आंदोलन सुरू केल्याने तणावपूर्ण शांतता निर्माण झाली आहे.

वाल्मीक कराड यांना मकोका अंतर्गत एसआयटीने ताब्यात घेऊन बीड जिल्हा न्यायालयासमोर हजर केले. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात तपास करण्यासाठी पोलीस कस्टडीची मागणी केली.यावर सुनावणी होऊन न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली. यामुळे जिल्ह्यामध्ये आता कराड समर्थक आक्रमक झाल्याचे चित्र दिसून येत आहे.त्यामुळे बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण आणि सामाजिक वातावरण तणावपूर्ण निर्माण झालेश्रआहे. वातावरण तणावपूर्ण होत असल्याने पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्ह्यात जास्तीचा पोलीस बंदोबस्त मागवल्याचे समजते.

### एसआयटीचा कोर्टात खळबळजनक दावा

सुरुवातीला एसआयटीचे तपास अधिकारी अनिल गुजर यांनी कोर्टाला हत्या प्रकरणातील तपासाबाबतची माहिती दिली. त्यानंतर सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी युक्तिवादाला सुरुवात केली.

युक्तिवादाच्या सुरुवातीलाच सरकारी वकिलांनी हत्या प्रकरणी अत्यंत खळबळजनक दावा केला. त्यांनी कोर्टाला माहिती देताना सांगितलं की, '९ डिसेंबरला खून झाला.त्या दिवशी दुपारी ३.२० ते ३.३० या दहा मिनिटात प्रत्यक्ष मारेकरी सुदर्शन घुले, विष्णू चाटे यांच्या सोबत वाल्मिक कराड यांचं देखील संभाषण झालं आहे.' त्यांचं त्यावेळी नेमके काय बोलणं झालं ? याची तपासणी करायची आहे. त्यामुळे वाल्मिक कराड यांची १० दिवसाची कस्टडी एसआयटीने मागितली. त्यावर विशेष न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली.

## मस्साजोग प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे पण यामध्ये कोणी राजकारण आणू नये - माजी आ.भीमराव धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे, पण यामध्ये कोणी राजकारण आणू नये असे मत माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केले. मस्साजोग प्रकरणी माजी आ. भीमराव धोंडे यांना कडा येथे पत्रकारांनी विचारले असता त्यांनी आपले मत व्यक्त केले. याविषयी पुढे बोलताना धोंडे म्हणाले की, गुन्हेगाराला कोणतीही जात – पात नसते. गुन्हेगार हीच त्याची जात



असते. ज्या पद्धतीने सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली आहे ते अत्यंत दुर्दैवी घटना आहे. माणुसकीला काळीमा फासणारी गोष्ट आहे. यामध्ये सहभागी असणाऱ्या गुन्हेगारांना मग ते कोणीही असोत त्यांना कठोर शिक्षा ही झालीच पाहिजे असे आपले स्पष्ट मत असल्याचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले.

पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, याविषयी कोणी राजकारण करत असेल तर ते करू नये राजकारणासाठी वेगवेगळे अनेक व्यासपीठ आहेत. विकासाच्या मुद्द्यांवर राजकारण करण्यात यावे परंतु अशा संवेदनशील विषयांमध्ये राजकारण करून समाजा – समाजामध्ये तेढ निर्माण होईल

(उर्वरीत पान २ वर)

## वाल्मिक कराडला केज येथे अटक

### पोलिस बंदोबस्तामध्ये बीड न्यायालयात परवानगी

केज/प्रतिनिधी

खंडणीच्या गुन्ह्यात मंगळवारी न्यायालयीन कोठडी मिळालेल्या वाल्मिक कराडला बीड कारागृहातून केज पोलीस ठाण्यात आणताच अटक केली. व मकोका प्रकरणी मकोका न्यायालयात हजर करण्यासाठी केज न्यायालयाची परवानगी घेऊन बीड न्यायालयात हजर करण्यात आले.वाल्मिक



कराडला मकोका लागल्यानंतर त्याला बुधवारी दुपारी केज पोलिसात अटक करण्यात आली.व केज येथे मकोका न्यायालय नसल्यामुळे केज न्यायालयाची परवानगी घेऊन त्याला बीड येथील मकोका न्यायालयात हजर करण्यासाठीपोलीस बंदोबस्तात पोलीस त्याला बीडकडे घेऊन गेले.वाल्मिक कराडला केजला आणल्या नंतर केज येथे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## वाल्मिक कराड समर्थन



### सलग दुसऱ्या दिवशी बाजारपेठ बंद

परळी / प्रतिनिधी

वाल्मिकअण्णा कराड यांच्या समर्थनार्थ सलग दुसऱ्या दिवशीही परळी येथील बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. वाल्मीक कराडवर मकोका लावण्यात आल्यानंतर मंगळवार दि १४ रोजी कार्यकर्त्यांनी शहरात फिरून बंदचे आवाहन केले होते. त्यानुसार परळीची बाजारपेठ मंगळवार दि १४ दुपारपासून बंद होती सलग दुसऱ्या दिवशीही सकाळपासूनच व्यापाऱ्यांनी आपले दुकाने उघडलेली नव्हती. शहरातील

(उर्वरीत पान २ वर)

## पुकारलेला परळी बेमुदत संप मागे परळी व्यापारी महासंघाचे आवाहन

परळी / प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या आढ अनावश्यक मिडियाच्या माध्यमातून परळीची होत असलेली बदनामी थांबवावी या मागणीसाठी परळी व्यापारी महासंघाच्या वतीने परळी बेमुदत बंद पुकारण्यात आला होता या बंदला परळीतील सर्व छोट्या मोठ्या व्यापारी बांधवांनी आपले व्यवहार बंद ठेवून उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला आहे.

आज मोंढा येथे आडत व्यापरी तथा परळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माऊली फड यांच्या आडत दुकानावर व्यापाऱ्यांची व्यापक बैठक घेण्यात आली या बैठकीत सविस्तर चर्चा करुन परळी बेमुदत बंद हा माघे घेण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे परळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माऊली फड, सचिव नंदकिशोर बियाणी यांनी सांगितले दरम्यान परळी शहरातील सर्व व्यापारी, व्यवसायीकांनी आप आपली उद्या पासून सुरळीत सुरू करावे असे आवाहन ही परळी व्यापारी महासंघाच्या वतिने करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांकडून बाँड पेपरवरची मागणी बंद करा अन्यथा अंदोलन करु : वंचितची मागणी

गेवराई ।प्रतिनिधी

तालुक्यातील २०२४ या खरीप हंगामातील पिके अतिवृष्टीमुळे वाया गेले होते. त्या पिकांची नुकसान भरपाई म्हणून शासन अत्यंत उशिराने तुटपुंजी मदत देत आहेत. त्यातच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या समाईक क्षेत्र असल्याने खात्यावर रक्कम जमा करण्यासाठी ७/१२ वर समाईक जमिन असल्याने तलाठी शेतकऱ्यांकडून बाँडवर नोटरीसह संमतीपत्राची मागणी करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना नाहक अर्थीक भुर्दंड सोसावा लागत असल्याने सदरील बाँडपेपरवरील संमतीपत्राची अट रद्द करण्यात यावी अन्यथा शेतकऱ्यांसह तहसिल कार्यालयावर तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा वंचीत बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने राजेंद्र पोकळे, पप्पु गायकवाड, किशोर भोले, ज्ञानेश्वर हवाले यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.


शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स) लेझर सेंटर



डॉ. प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S., M.D. (Anaesthesia)
भुलतज्ञ

डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S., M.S. (Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेबर सर्जन



आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच..... महिला मुळव्याध तज्ञ
डॉ. सौ. मीरा प्र. ढाकणे (नागरे) महिला रुग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील

मुळव्याध करीता विशेष उपचार

* लेजर उपचार
* इंजेक्शन उपचार
* ऑपरेशन उपचार
* क्षारसुत्र उपचार,
* मुळव्याध, भगंदर
* फिशर, मलबध्दता
* संडासवाटे रक्तस्त्राव होणे.
* बस्ती उपचार
* स्तनातील गाठी
* शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
* स्तनामध्ये पु होणे.
* मोस, जामखीळ व कुरुप काढणे
* गर्भावस्था किवा प्रसुतीनंतर
* मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार

हॉस्पीटलचा पत्ताशिवसमर्थ मुळव्याध हॉस्पीटल साई कॉम्पलेक्स, आदर्श नगर, डि.पी.. रोड बसस्टॅन्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड मो.क्र.9623079009

संपादकीय

# विरोधी ऐक्याची लक्तरे

महाराष्ट्र व हरियाणातील निकालांनंतर 'इंडिया' या विरोधकांच्या बोटीत पाणी शिरू लागलेच होते. तिला दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने जलसमाधी मिळेल, असे दिसते. ती तशी मिळणारच होती.

महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांचे निकाल हा 'इंडिया' या विरोधकांच्या आघाडीला आणि राहुल गांधी यांच्या सर्वमान्य नेतृत्वाला पहिला हादरा होता. लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसने गेल्या दोन निवडणुकांच्या तुलनेत चांगली कामगिरी केली. विरोधी पक्षनेतेपद मिळविले. राहुल गांधी यांचे नेतृत्व सगळे विरोधक स्वीकारणार, असे चित्र तेव्हा निर्माण झाले होते. मात्र, काँग्रेसला सगळ्या छोट्या-मोठ्या मित्रपक्षांना सोबत घेऊन चालण्याची सवय नाही. मित्रपक्षांसाठी त्याग करायचा असतो आणि सतत आपल्या ताकदीच्या बाता मारायच्या नसतात.

महाराष्ट्र व हरियाणातील निकालांनंतर 'इंडिया' या विरोधकांच्या बोटीत पाणी शिरू लागलेच होते. तिला दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने जलसमाधी मिळेल, असे दिसते. ती तशी मिळणारच होती. दिल्लीत या वेळी काय होते आणि भारतीय जनता पक्ष अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षासमोर आता तरी आव्हान उभे करणार का, हा प्रश्न असतानाच सगळे महत्त्वाचे विरोधी पक्ष केजरीवाल यांच्या पाठीशी उभे राहावेत आणि त्यांनी काँग्रेसवर टीका करावी; हे 'इंडिया' ही केवळ कागदोपत्री उरलेली आघाडी असल्याचे स्पष्ट करते. दिल्लीत विधानसभा निवडणुकांत आम आदमी पक्षाने भाजपला वारंवार चारी मुंड्या चीत केले आहे आणि असे असताना काँग्रेसने थोडे पडते घेऊन ही लढाई तिरंगी होऊ देऊ नये; ही विरोधी नेत्यांची अपेक्षा चूक नाही.

# जिज्ञासा मार्फत गुरु मिश्री महाविद्यालया शेलगाव येथे सूर्यनमस्काराचे आयोजन

बदनापूर ।प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बदनापूरच्या जिज्ञासा आयामांतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त गुरु मिश्री महाविद्यालयामध्ये सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले. युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती अखिल भारतीय विद्यार्थी परिषद युवक सप्ताह म्हणून साजरा करत असते. या निमित्त सप्ताहभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, आरोग्य शिबीर, स्वच्छता अभियान असे विविध कार्यक्रम युवक सप्ताह दरम्यान पार पडतात.

आयुर्वेदिक व होमिओपॅथीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभाविपचा जिज्ञासा हा आयाम काम करतो. याच अनुषंगाने युवक सप्ताह निमित्त गुरू मिश्री महाविद्यालय, शेलगाव येथील मुलांच्या वसतिगृहात सूर्यनमस्काराचे आयोजन करण्यात आले. यावेळी अभाविप बदनापूर शहराध्यक्ष प्रा. डॉ. रामेश्वर पाटील, बदनापूर जिज्ञासा संयोजक डॉ. शुभम जाधव आणि अभाविप जालना जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे हे उपस्थित होते.

यावेळी प्रा. डॉ. रामेश्वर पाटील



म्हणाले की, येथे सर्व विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेणारे आहेत आणि विद्यार्थी परिषद नेहमीच म्हणते की विद्यार्थी हा उद्याचा नाही, तर आजचा नागरिक आहे. त्याच प्रमाणे वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी देखील उद्याचे नाही, तर आजचे डॉक्टर आहात आणि याचा उपयोग आपण राष्ट्रहितासाठी नक्कीच केला पाहिजे..



अंबड – शिवाजीराव सूर्यभान भुमरे (वय ६२ रा.पाचोड ता.पैठण)यांचे मंगळवारी दुपारी १२ वाजता अल्पशा अजारनि निधन झाल. त्यांच्या पार्थिवावर सायंनकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्यात पत्नी.दोन मुले.दोन सुना.नातवंडे.आसा परिवार होता.



महाराष्ट्र राज्याचे मा.आरोग्य मंत्री मा.राजेश भैय्या टोपे साहेब यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देतांना बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोकजी थोरात साहेब, सुहास पाटील, लोक पत्रकार भागवतजी तावरे, जावेद भाई.

# विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य आणि चरित्र वाचून त्यातून बोध घ्यावा

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा मध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री रवींद्र जोगदंड

बीड ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड अभ्यास आणि वाचनातून इतर देशांच्या राज्यघटनांचा ही अभ्यास केला आणि त्यातून आपल्या देशासाठी हितकर अशी मूल्ये निवडून आपल्या देशाच्या राज्यघटनेची निर्मिती केली जी संपूर्ण देशाला मार्गदर्शन देणारी ठरली. असे विचार उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी प्रोजेक्ट तथा उपआयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर रवींद्र जोगदंड यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमा अंतर्गत



आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी त्यांनी आपले मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य वाचन करण्या बद्दल प्रोत्साहन दिले. या प्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे आणि सर्व सहकारी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर आणि सहकारी सचिन चौरे, बाळासाहेब वाघमारे यांनी केले. प्रदर्शनाला व व्याख्यानाला बहुसंख्य विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते.

# डॉ. शैलेश हदगांवकर मणक्याच्या शस्त्रक्रियेतील अग्रगण्य कार्यासाठी मराठवाडा गौरव २०२५ ने सन्मानित

छ संभाजीनगर (प्रतिनिधी)

देशभरात नावाजलेल्या संचेती हॉस्पिटलचे स्पाईन अँड न्यूरोसर्जन विभागप्रमुख डॉ शैलेश हदगावकर हे मणक्याच्या शास्त्रक्रियेतील अग्रगण्य कार्यासाठी मराठवाडा गौरव २०२५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजी नगर येथील हॉटेल हयात पॅलेस याठिकाणी डॉ हदगावकर हे महाराष्ट्र अर्थोपेडिक असोसिएशन , तसेच औरंगाबाद ऑर्थोपेडिक असोसिएशनचे अध्यक्ष डॉ फैसल खान व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पुण्यातील प्रसिद्ध मणक्याचे शल्य चिकित्सक डॉ. शैलेश हदगांवकर हे मणक्याच्या उपचारांना अनुकूल बनवणे, मणक्याच्या प्रगत शस्त्रक्रियेमध्ये क्रांती घडवून आणणे, मणक्याच्या शस्त्रक्रियेच्या सरावात उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्णतेचे मानक स्थापित करण्यात अग्रेसर आहेत.

पुण्यातील संचेती रुग्णालयातील स्पाइन अँड न्यूरोसायन्स युनिटचे प्रमुख म्हणून कार्यरत असतांना डॉ. शैलेश हदगांवकर यांनी या क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकणाऱ्या नेव्हिगेशन आधारित स्पाइन सर्जरी आणि एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरीमधील त्यांच्या अग्रगण्य सहभाग आहे. छ. संभाजी नगर येथील हॉटेल हयात प्लेस येथे ५ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या चज---ज- स्पाइन कॉन्क्लेव्ह (महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन-औरंगाबाद ऑर्थोपेडिक असोसिएशन) दरम्यान हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ए. ओ. ए. चे अध्यक्ष डॉ. फैसल खान त्याचबरोबर डॉ हिमांशू कुलकर्णी हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. याशिवाय या पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी अंदाजे ५०० मान्यवरांची



उपस्थिती होती.

डॉ. हदगांवकर यांच्या समर्पक वृत्तीने, नाविन्यपूर्ण तंत्राने आणि त्यांच्यातील नेतृत्व गुणांनी जगभरातील अनेकांच्या जीवनात बदल घडवून आणला आहे असे पुणे येथील संचेती रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. पराग संचेती यांनी सांगितले. डॉ. शैलेश हदगांवकर यांनी युरोप (इंग्लंड), आफ्रिका (केनिया/ टांझानिया) आणि भारतात सराव केला आहे आणि जगाच्या विविध भागात देखील त्यांनी मणक्यांच्या आजारांसाठी रुग्णांवर उपचार केले आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये ५० हून अधिक प्रकाशने प्रकाशित करून त्यांनी मणक्याच्या शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात व्यापक असे योगदान दीले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी ओळखले जाणारे डॉ. हदगांवकर हे पाठीच्या कण्याच्या विकृतीच्या क्षेत्रात ज्याला स्कोलियोसिस म्हणता येईल या क्षेत्रात त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संचेती हॉस्पिटल, पुणे, महाराष्ट्र येथे फॅकल्टी म्हणून -ज डळिपश( ए. ओ. स्पाइन) स्कोलियोसिस सप्ताह आयोजित केला आहे. २०१० साली इंग्लंडहून परतल्यानंतर मणक्याच्या संबंधी रुग्णांसाठी इंटरव्हेन्शनल पेन ब्लॉक्स आणि एकदिवसाच्या शस्त्रक्रिया सुरू करणाऱ्या मोजक्या सर्जन पैकी ते एक आहेत.त्यांच्या या अलौकिक कार्याद्वारे त्यांनी रुग्णांचे केवळ वैयक्तिक जीवनच सुधारले नाही तर वैद्यकीय शास्त्राच्या सीमा देखील ओलांडल्या आणि त्यामुळे या क्षेत्रात उल्लेखनीय बदल झाला.

ए. ओ. स्पाइन या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेशी त्यांचा सबंध हा संशोधन आणि इतरांना आपल्याकडील ज्ञान, कौशल्य देण्याप्रति त्यांची बांधिलकी अधोरेखित करतो. ते ए. ओ. स्पाइन (ए. ओ. एस. आय. एन.) चे सी. डी. कार्यालय आहे तेथे ते सामुदायिक विकासासाठी जबाबदार आहेत आणि फेलोशिप अधिकारी आहेत.

याव्यतिरिक्त, त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, ग्रीस आणि दक्षिण कोरियामध्ये प्रशिक्षण घेतले आहे. स्लिप डिस्क, सायटिका, स्पॉन्डिलोसिस, स्पायनल इंज्यूरी आणि स्कोलियोसिस यासारख्या वेदनादायक परिस्थितींसाठी पर्यायी उपचार आणि शस्त्रक्रियेतर उपचारांचा शोध घेण्यात ते कायम अग्रेसर असतात. त्यांच्या बहुतांश रुग्णांवर किफायतशीर उपचार करण्यावरही त्यांचा विश्वास आहे. डॉ. शैलेश हदगांवकर यांनी ग्लोबल एपीआय ई जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या आणि वारंवार उद्धृत केल्या जाणाऱ्या समांतर रॉड्सचा वापर करून टीएल स्पाइनच्या फ्रॅक्चर डिस्लोकेशनसह काही अभूतपूर्व तंत्रांचे नेतृत्व केले आहे. छत्रपती संभाजी नगर ऑर्थोपेडिक असोसिएशन, छ. संभाजी नगर चे अध्यक्ष डॉ. फैजल खान यांनी डॉ. हदगांवकर हे या पुरस्काराचे सर्वात योग्य प्राप्तकर्ता आहेत. त्यांनी या प्रदेशाचे आणि महाराष्ट्राचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात आणले आहे. या भागातील अशा शस्त्रक्रिया करणाऱ्या या क्षेत्रात नव्याने काम सुरु केलेल्या डॉक्टरांना डॉ. हदगांवकर यांच्याकडून प्रेरणा मिळते असेही डॉ फैसल खान या कार्यक्रमात म्हणाले. प्रख्यात मणक्याचे शल्य चिकित्सक डॉ. विवेक देशमुख या पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने सांगतात की डॉ. शैलेश हे एक महान शिक्षणतज्ज्ञ आणि एक उत्तम माणूस आहेत, त्यांची रुग्णसेवेची मूल्ये अभूतपूर्व व वाखाणण्याजोगी आहेत. हा पुरस्कार डॉ. हदगांवकर यांनी पाठीच्या मणक्याच्या क्षेत्रात् काम करणाऱ्या सर्व लोकांना येन केन प्रकारे मदत करण्यासाठी, त्यांचे या क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि पाठीच्या कण्याच्या देखभालीच्या प्रगतीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांसाठी देण्यात आला असल्याचे सांगलीचे डॉ. हिमांशू कुलकर्णी यांनी सांगितले.

डॉ. शैलेश हदगांवकर यांनी -ज- ( औरंगाबाद ऑर्थोपेडिक असोसिएशन) सभासदांना मार्गदर्शन केले.ऑस्टियोपोरोटिक स्पॉन्डिलोलिस्थेसिससाठी त्यांच्याकडे लिमो डेल्टा म्हणून काही तंत्रे आहेत. तसेच, नेव्हिगेशनमध्ये नेव्हिगेशन आणि सव्हायकल आणि डोर्सोलंबर यूबीई एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी अंतर्गत स्पाइन स्टेंट (वर्टेब्रल बॉडी स्टेंटिंग) करणारे ते भारतातील पहिले आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक चर्चासत्रे, वेबिनार आयोजित केले आहेत. अनेक मोफत आरोग्य शिबिरे, जनजागृती कार्यक्रमांच्या आयोजनात देखील डॉ शैलेश यांचा सक्रिय भाग आहे. आगामी काळात पाठीच्या कण्याच्या दुखापतींवर अधिक संशोधन करायचे असल्याचे डॉ. शैलेश हदगांवकर म्हणाले.या कार्यक्रमास महाराष्ट्रातून पाचशेच्या वर डॉक्टर सहभागी झाले होते. मिळालेल्या पुरस्काराबद्दल डॉ शैलेश यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन व कौतुक होऊन त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## जाहीर प्रगटन

**ॲड. पांडव जे. डी.**

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क. ८१/२०२५**

**संजीवनी गोरख वाघ वि. निरंक**

**अर्जदार -१.संजीवनी गोरख वाघ वि. निरंक**

**वय-४७ वर्षे, धंदा-घरकाम**

**रा. शिवनेरी कॉलनी, ईमामपुर रोड, बीड ता. जि. बीड**

**गैरअर्जदार निरंक**

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत कोमल गोरख वाघ यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत कोमल गोरख वाघ हे दिनांक ०३ / १२ / २०२४ रोजी फिनिक्स हॉस्पिटल, जालना रोड, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ या मयताच्या आई आहेत. त्यांचे शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे कोमल गोरख वाघ या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे कोमल गोरख वाघ रा. शिवनेरी कॉलनी, ईमामपुर रोड, बीड ता. जि.बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख २७/०२/२०२५.

आज दिनांक १३/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**स्वाक्षरित/–**
**क.लि.**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/–**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड.**

पान १ वरून...

**सरपंच संतोष..**

निर्माण केल्या बाबत निता गजानन दामधर महीला पोलीस उपनिरीक्षक, शिवाजीनगर पोलीस स्टेशन यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं.३०/२०२५ बी.एन.एस.एस. कलम १३२, २२१, १८९ (२), १८९(३), १९१(२), १९० सह म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन तपास चालु आहे.

तरी बीड पोलीसांकडून सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, सध्या बीड जिल्ह्यात मा.जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेश लागू असून कोणीही गैरकायदेशीर जमाव जमवुन बेकायदेशीरपणे आंदोलन करुन सार्वजनीक शांतता भंग होईल असे कृत्य करु नये तसेच दोन समाजात तेढ निमर्माण होईल अशा प्रकारचे वक्तव्य प्रत्यक्ष अथवा सोशल मिडीयावर करु नये अथवा आक्षेपार्ह मजकुर लिहू नये असे आढळून आल्यास प्रचलीत कायद्यान्वये संबंधीता विरुध्द गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.असे जाहीर आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

**वाल्मिक कराड**

आडत बाजारपेठ , किराणा लाईन, मेन रोड, राणी लक्ष्मीबाई टावर, नेहरू चौक, स्टेशन रोड व अन्य ठिकाणची दुकाने बंद असल्याचे दिसून आली. काही ठिकाणचे अत्यावश्यक असलेली औषध दुकाने चालू होती.तर तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या धर्मापुरी व सिरसाळा या ठिकाणी देखील बाजारपेठही सकाळपासूनच बंद ठेवत कडकडीत बंद पाळण्यात आला. या ठिकाणी वाल्मीक कराड समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करत खोटे गुन्हे मागे घेण्याची मागणी केली.

दरम्यान, वाल्मीक कराड यांच्या पांगरी गावात बुधवार दि १५ रोजी सकाळी कराड यांच्या गावी पांगरी कॅम्प येथील बीएसएनएलच्या मोबाईल टॉवरवर गावातील ५ समर्थक कार्यकर्त्यांनी चढून आंदोलन सुरू केले आहे. वाल्मीक कराड यांना न्याय द्यावा व त्यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्यावे या मागणीसाठी ग्रामस्थ ही रस्त्यावर उतरले असून त्यांनी आंदोलन सुरू केले आहे.

**मस्साजोग प्रकरणातील ..**

अशी कोणतेही वक्तव्य अथवा कृती कोणाकडूनही होऊ नये कारण गुन्हेगाराला कोणत्याही समाजाचे कधीच पाठबळ नसते, त्यामुळे त्यांच्या गुन्हेगारी कर्तव्याला कोणताही समाज जबाबदार नसतो. काही गुन्हेगारांच्या

## अंबड नगर परिषद अंबड जि.जालना

**जा.क्र.न.प./अंबड/कार्या-६/२०२५/३६** **दिनांक : १५/०१/२०२५**

### ई- निविदा नोटिस (दुसरी वेळ)

मुख्याधिकारी अंबड नगरपरिषद हे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना २०२४-२५ व वैशिष्टयपुर्ण निधी सन २०२३-२४ योजने अंतर्गत अंबड शहरामध्ये विविध ठिकाणी सि. सि. ट्रिमिक्स रस्ता बांधकाम करणे, ई. अनुषगीक कामे कर करिता ई - निविदा टक्केवारी एल- १ फॉर्ममध्ये अनुभवी व नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे. सदर निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे. शुध्दीपत्रक इत्यादीची माहिती **http/:mahatenders.gov.in** यासंकेत स्थळावर दि. १६/०१/२०२५ पासून उपलब्ध होईल.

**स्वाक्षरित/–**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद अंबड**

## जाहीर प्रगटन

**कलम १३ ( ३ ) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व जनता मौजे वडीरामसगाव ता. घनसावंगी यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. सुरेश दत्तात्रय सातपुते रा.वडीरामसगाव ता. घनसावंगी जि.जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र,देवुन त्यांनी त्यांचे स्वतःचे नामे सुरेश दत्तात्रय सातपुते यांचा /हिचा जन्म दि. १२/०१/१९९१ ही दर्शविलेली आहे.अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/हरकती/आक्षेप/ आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे.मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तालुका दंडाधिकारी**
**घनसावंगी**

पान १ वरून...

कृतीमुळे समाजा - समाजामध्ये दुरावा निर्माण करणे ही चांगली बाब नाही.

गेल्या काही दिवसांपासून मीडियावर बीडचा बिहार होतोय अशा आशयाच्या बातम्या झळकवल्या जात आहेत अशा बातम्यांमुळे बीड जिल्ह्याची राज्यभर नव्हे तर देशात बदनामी होत आहे. ती कृपया थांबवावी. अशा बातम्यांना खतपाणी घातले जाणार नाही याची जिल्ह्यातील राजकीय लोकांनी दक्षता घ्यावी अशी सूचनाही माजी आ. धोंडे यांनी केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात सी. आय. डी., एस. आय. टी. नेमलेली आहे तसेच गुन्हेगारांना मोकका लावला आहे. संबंधित यंत्रणेवर सर्वांनी विश्वास ठेवावा विना हस्तक्षेपाचे त्यांना काम करून द्यावे असे भीमराव धोंडे यांनी सांगितले.

# 'सावरकर ' मध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा २५ ' विविध उपक्रमांनी आणि 'स्कूल कनेक्ट २.०' शाळांना भेट देवून साजरा

बीड ।प्रतिनिधी

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयांत उच्च व तंत्र शिक्षणविभाग, महाराष्ट्र शासन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नियोजित उपक्रम वाचन संकल्प महाराष्ट्राचा व स्कूल कनेक्ट २.० उपक्रम राबवले गेले.स्कूल कनेक्ट २.० अंतर्गत विविध शाळा कॉलेज मध्ये जावून ९ वी, १० वी, ११ वी, १२ वी विद्यार्थ्यांपर्यंत राष्ट्रीय शिक्षा धोरण आणि त्यातील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या पैलूंवर प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आणि त्यांना महाविद्यालयीन शिक्षणाप्रती जागृत आणि आकर्षित केले. सर्व शाळांनी या उपक्रमास भरभरून



प्रतिसाद दिला.ग्रंथालयां द्वारा 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा २५' या अनुषंगाने विविध अशा अठरा उपक्रमांचे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाप्रती गोडी निर्माण होऊन त्यांच्या वाचन सवयी वृद्धिंगत व्हाव्यात यासाठी प्रयत्न केले गेले. या उपक्रमामध्ये प्रामुख्याने विविध प्रकारच्या पुस्तकांची आकर्षकरित्या मांडणी केलेले ग्रंथ प्रदर्शन, वाचनीय पुस्तकांची प्रदर्शित केलेली सूची, सामूहिक वाचन, फिरत्या गाडीतील ग्रंथ प्रदर्शन, विस्तरसेवेचा भाग म्हणून शिशुवाटिकेतील बालकांसाठी कथाकथन आणि कविता वाचनाचा कार्यक्रम, वाचन कौशल्य कार्यशाळा, लेखन कौशल्य कार्यशाळा, विविध विषयावरील साहित्यांवर चर्चा, पुस्तक परीक्षण कसे लिहावे यावर विद्यार्थ्यांना गटशहा मार्गदर्शन, ग्रंथ खरेदी, ग्रंथ भेट, विविध विद्यापीठ स्तरीय मान्यवरांच्या भेटी तसेच वाचन संकल्प अभियान विद्यापीठ समिती सदस्य प्रो. विना हुंबे यांची भेट अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल या निमित्ताने महाविद्यालयात आखली गेली. या सर्व उपक्रमास सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांसाठी पुस्तक परीक्षण या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलेले आहे. सहभागी विद्यार्थ्यांचा ' सेल्फी विथ बुक' असा उपक्रम ही या सोबतच राबवला जाणार आहे. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी बक्षीस वितरण केले जाईल. असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी सांगितले.

स्कूल कनेक्ट २.० साठी डॉ. हंसराज जोशी यांनी नियोजनबद्ध रूपरेषा आखून उपक्रम राबवला. तर वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम डॉ. अनुजा कास्तीकर यांच्या कल्पनेतून सर्व वाचन संकल्प महाराष्ट्राचा महाविद्यालय समिती सदस्यांनी तसेच सचिन चौरे आणि बाळासाहेब वाघमारे यांच्या प्रयत्नातून यशस्वी झाले. सदर उपक्रमास उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

# अॅबाकस अवकाशात पांचवा तारा चमकला ऋत्विक गाडेकर

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील रहिवासी तथा जामखेड येथील पोद्दार ईंग्लिश स्कुलमधे शिक्षण घेत असलेला ऋत्विक हरिप्रसाद गाडेकर हा रविवारी झालेल्या अॅबाकसच्या परिक्षेत पांचवा तारा म्हणून चमकला तर त्याला ट्राफी देऊन गौरवीण्यात आले .

शैक्षणीक क्षेत्रात अॅबाकस हे शैक्षणीक तंत्र झटपट जास्तीत गणीताचे उत्तर कमी वेळात देण्याचे कौशल्य अवगत केले जाते ,पांच मिनिटात ऋत्विकने एकशे सतरा उत्तरे लिहून या क्षेत्रात आपली चमक दाखवली ,त्याची ही पहिलीच वेळ असुन देखील पांचवा



क्रमांक मिळवल्याने कौतुकाचा वर्षाव होत आहे .पोद्दारचे प्राचार्य ,पोद्दारचे संचालक ,शिक्षकासह शिरूरमधूनही ऋत्विकचे कौतूक होत आहे .




## 'सावरकर ' मध्ये 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत जिजामाता आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

बीड ।प्रतिनिधी

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणी करीत ग्रंथालयांने विविध उपक्रमाचे आयोजन केले. यात जिजामाता आणि स्वामी विवेकानंद जयंती निमित्त त्यांच्या साहित्याच्या प्रदर्शनासह ग्रंथ वाचनाचा उपक्रम राबवला. या प्रसंगी हनुमान जाधव, जालना जिल्हा, शारीरिक प्रमुख, संदिपान सोनवणे, किशोर चौधरी, अभिषेक पवार, अंबादास आव्हाड आणि सज्जनकुमार खेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. पाहुण्यांना महापुरुषांची पुस्तके भेट देण्यात आले.

प्राचार्य प्रो. सुहास मोराळे व ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम पार पडला. उपक्रमाचे नियोजन व यशस्वीतेसाठी श्री. सचिन चौरे यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे राजकुमार काळे आणि इतर सहकारी आणि विद्यार्थी प्रसंगी उपस्थित होते.

# पैसे नसल्याने गावाकडे परत आणलेल्या आरती कटारे यांना जीवनदान

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या मदतीने झाले उपचार

दिंद्रुड ।प्रतिनिधी

नुकतीच प्रसूती झालेल्या वीस वर्षीय तरुणीच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. तसेच रुग्णाला ताबडतोब संभाजीनगर ला हलविण्याच्या सूचना दिल्या. पतीने पत्नीला वाचविण्यासाठी तातडीने संभाजीनगर गाठले. मात्र डॉक्टरांची गडगंज फिस भरण्याची ऐपत नसल्यामुळे महिलेला घरी परत आणले. परंतु आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करुन दिल्याने सदरील महिलेला जीवनदान मिळाले आहे.याबाबत अधिक वृत्त असे की, माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील कैलास कटारे हा तरुण भूमिहीन आहे. तो पाण्याच्या जार प्लांट वर रोजंदारीने काम करुन चरितार्थ चालवतो. वडिलांचे छत्र हरवलेल्या कैलासचा विवाह दोन वर्षांपूर्वी झाला होता. दोघांचा संसार गुण्या गोविंदाने चालू होता. कुटुंबातील सर्वजण नवीन पाहुण्याचे आगमन होणाऱ्या आनंदात होते. कैलासची पत्नी आरती हिला प्रसूतीसाठी परळी येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. नैसर्गिक प्रसूती झाल्यानंतर सर्वांना आनंद झाला.

परंतु तिसऱ्या दिवशी आरतीला प्रचंड त्रास होत असल्याने डॉक्टरांनी तिला अंबाजोगाई येथील स्वाराती हॉस्पिटलला पाठवले. मात्र आजार गंभीर असल्याने तेथील डॉक्टरांनी तपासणी करून



संभाजीनगर येथील मोठ्या दवाखान्यात भरती करण्याचा सल्ला दिला. कटारे यांनी तातडीने संभाजीनगर गाठले. तेथील डॉक्टरांनी उपचारासाठी मोठा खर्च सांगितला, तसेच ताबडतोब ५० हजार रुपये काऊंटरला जमा करण्याचे सांगितले. परंतु पेशंटच्या नातेवाईकाकडे पैसे नसल्यामुळे ते पेशंटला गावाकडे घेऊन परत आले. पत्नीचा जीव वाचविण्यासाठी कैलासने मोटारसायकल विक्री काढली. तसेच अनेकांकडे उसने पैसे मागितले, मात्र यश आले नाही. जसजसा काळ जात होता तसतशी आरतीची तब्येत वरचेवर बिघडत चालली होती. कोणीतरी त्यांना देवदूत डॉ.

ओमप्रकाश शेटे यांना भेटण्याचा सल्ला दिला. त्यातच कैलास कटारे यांची पत्रकार गणेश काटकर व नागेश वकरे यांची भेट झाली. कैलासने त्यांना सर्व आपबिती सांगितली.गणेश काटकर यांनी लागलीच देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांना फोन करून पेशंटची परिस्थिती सांगितली. त्यांनी सांगितले की, तुम्ही पैशाची चिंता करू नका पेशंटला घेऊन संभाजीनगर येथील सिग्मा हॉस्पिटलला घेऊन जा. डॉ.शेटे यांनी डॉ.उन्मेष टाकळकर यांना फोन करून पेशंटवर उपचार करण्याबाबत सांगितले. त्यानुसार आरतीवर उपचार सुरु झाले. तब्बल पंधरा दिवसांच्या उपचारानंतर आरती ठणठणीत बरी झाली आहे. योग्य वेळी मदत केल्याबद्दल आरतीच्या नातेवाईकांनी डॉ.ओमप्रकाश शेटे यांचे आभार मानले.

ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे आरतीच्या मेंदूत रक्तस्त्राव झाला होता. अशा रुग्णांना ताबडतोब उपचार मिळणे अत्यंत गरजेचे असते. परंतु उपचारादरम्यान काही दिवसांचा कालावधी गेल्यामुळे रुग्णाच्या जिवितास धोका निर्माण झाला होता. मात्र डॉ. ओमप्रकाश शेटे सरांचा पाठपुरावा, आमच्या डॉक्टरांचे प्रयत्न व ईश्वराच्या कृपेने आरती कटारे आता बरी झाली आहे.

– डॉ. उन्मेष टाकळकर (सिग्मा हॉस्पिटल, संभाजीनगर)

# राजेश गदळे यांना मातृतीर्थ प्रतिष्ठानचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान

बीड ।प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान यांच्याद्वारे दरवर्षी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींचा राज्यस्तरावर गौरव करण्यात येतो. त्याच अनुषंगाने रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी, ता. केज जि. बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालय शाहूनगर ,बीड येथील सहशिक्षक श्री राजेशजी गदळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थिती महंत ह.भ. प. राधाताई महाराज , ह. भ. प. मोहन महाराज खरमाटे, माजी आमदार उषाताई दराडे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच




शाळेतील विविध उपक्रमाद्वारे नावलौकिक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गुणवंत विद्यार्थी म्हणून सन्मान करण्यात आला यात ओमसाई गायकवाड, गदळे आनुष (विज्ञान प्रदर्शनात जिल्हास्तरावर निवड)शेख राहीन(योगासन जिल्हास्तर)आंधळे सृष्टी(रामानुजन ऑलिम्पियाड गोल्ड मेडल)पवार तनुजा( इंस्पायार अवॉर्ड) यांचा समावेश आहे.एकाच शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री विक्रम बप्पा मुंडे,अध्यक्ष मा. विजयकांत भैय्या मुंडे,सचिव मा. अतुल दादा मुंडे शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. तसेच संपूर्ण स्टाफ आणि मित्रपरिवार यांनी सरांच्या आणि शाळेच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

# माहिती व तंत्रज्ञानाचा बदल लक्षात घेता सर्व नागरिकांनी ऑनलाईज अर्ज भरावे

## राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव

बीड ।प्रतिनिधी

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात झपाट्याने झालेला बदल पाहता आपल्या कामाचा निपटारा लवकर होण्याच्या दृष्टीने व शासकीय कामात पारदर्शकता यावी यासाठी तंत्रज्ञानाचा अधिक वापर करुन नागरिकांनी ऑनलाईन अर्ज भरावेत, असे वक्तव्य राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात विविध विभागाच्या आढावा बैठकी प्रसंगी केले.

यावेळी ते म्हणाले की, आपले सरकार सेवा केंद्राच्या ठिकाणी नागरिकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी तिथे कोण कोणते कामाचे फॉर्म ऑनलाईन भरल्या जातात त्यासाठी दर्शनी भागात बोर्ड लावून त्यावर सर्व माहिती मराठीत लिहून ठेवावी, तसेच तिथे पिण्यासाठी स्वच्छ पाणी, तक्रार पेटी, विहीरीसाठी अनुदान बाबत माहिती , इतर सुविधा असायला हव्यात, या केद्रांची संबधित अधिका–यांनी वेळो–वेळी तपासणी करुन त्यांना सूचना द्याव्यात.

जिल्हयात ३८ विभाग आहेत ज्या




विभागातील अपिलीय अधिका–यांनी ऑनलाईन पध्दतीने चांगली कामे केली आहेत त्या अधिका–यांचा २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्याच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी संबधित विभागाला दिल्या. आपले सरकार सेवा केंद्रातील अधिकच्या माहितीसाठी शाळा व महाविद्यालयामध्ये तसेच कॅम्प घेऊन विद्यार्थ्यांना माहिती होईल, आपल्या हक्काची पायमल्ली होऊ नये यासाठी ग्रामसेवक,तलाठी, मंडळ अधिकारी यांनीही स्वत:च्या प्रोफाईलवरुन अर्जाचे अपिल करण्याकडे लक्ष द्यावे. आपले सरकार सेवा पोर्टल महाराष्ट्र हे पहिले राज्य होते, पण ते आता २६ क्रमांकावर आहे, हे पोर्टल गतिमान करुन अधिक सक्रीयतेने व सुलभरित्या व्यापक स्वरुपात नागरिकांना जास्तीत जास्त प्रमाणात सुविधा देण्यासाठी संबधित विभागाने प्रयत्न करावेत असेही डॉ. जाधव यावेळी म्हणाले. बीड जिल्हयातील सन २०२३- २०२४ च्या झालेल्या कामाबद्दल डॉ.जाधव यांनी समाधान व्यक्त केले तसेच २०२५ च्या कामात शासन अधिक गतीने प्रलंबित कामाचा निपटारा करतील अशी आशाही त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी, अधिकारी आदित्य जीवने, अपर जिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन) चे शैलेश सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी, इंगोले, उपविभागीय अधिकारी लाटकर, तहसीलदार चंद्रकांत शेळके विविध विभागाचे संबधित अपिलीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले.

# बीडकरांसाठी मणिपाल हॉस्पिटल पुणेचे मेंदू, मनका व नस विकाराचे तपासणी शिबिर

## रविवारी विश्व हॉस्पिटलमध्ये होणार माफत दरामध्ये उपचार आणि मार्गदर्शन

बीड ।प्रतिनिधी

खास बीड जिल्हावासियांच्या सोयीसाठी पुणे येथील सुप्रसिद्ध मणिपाल हॉस्पिटल येथील न्यूरोसर्जन डॉ अमित धाकोजी यांचे विश्व हॉस्पिटल येथे, बीडकरांसाठी मेंदू, मनका व नसा च्या विकाराचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मेंदू ,मनका व नसाचे विशेषज्ञ डॉ विशाल पिंगळकर यांच्या विश्व न्यूरो स्पाईन सर्जिकल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि रिहॅबिटेशन सेंटर बीडआणि मणिपाल हॉस्पिटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील गरजू रुग्णांसाठी भव्य मेंदू,मनका व नसाच्या विकाराची आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून .जिल्ह्यातील सर्व गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन मणिपाल हॉस्पिटल पुणे आणि विश्व हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे..!

मणिपाल हॉस्पिटल पुणे या सुप्रसिद्ध हॉस्पिटलचे न्यूरोसर्जन डॉ अमित धाकोजी आणि न्यूरोसर्जन डॉक्टर विशाल पिंगळकर यांचे उपचार आणि मार्गदर्शन घेण्यासाठी विश्व न्यूरो स्पाईन सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि रिहाबिटेशन सेंटर मधुलिनी स्क्वेअर, शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या बाजूला बार्शी रोड,बीड येथे रुग्णांनी अवश्य भेट द्यावी..

दिनांक १९ जानेवारी २०२५ रविवार रोजी सकाळी १० ते ०४ या वेळेमध्ये शिबिर होणार आहे. तरीही खालील आजार असणाऱ्या रुग्णांना याचा लाभ घ्यावा शिबिरामध्ये डोक्याचे मणक्याचे अपघात, अर्धांग वायू ,मेंदूमधील गाठी ,मज्जा तंतू मधील गाठी,मेंदूमध्ये झालेला रक्तस्त्राव, मेंदूच्या गाठी, मेंदूचे इन्फेक्शन,मनका घसरणे,मणक्याची गादी घसरणे, मनक्यातील गॅप असने ,पाठ दुखणे,हातापायांना मुंग्या येणे, बधीरपणा असणे,डोकेदुखी,अर्धे डोकेदुखी,चक्कर येणे, सतत उलटी होणे, हातापायांना अशक्तपणा, हातापायाची अनैच्छिक हालचाली,कंपवात, पाठीवर अथवा डोक्यावर जन्मजात गाठ, हातापायाची संवेदन शक्ती कमी होणे , फेफरे,झटके, अडखळत चालणे, बधिरपणा, पाठीचे दुखणे,स्मृती भ्रष, दुहेरी दृष्टिक्षेप ,तोंडाची जळजळ, चेहऱ्यावरचा अशक्तपणा, इत्यादी आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांनी या भव्य आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा.तसेच विश्व हॉस्पिटलमध्ये नसाची तपासणी करिता एएऋ,छउत या मेंदूच्या नसाच्या तपासण्याही उपलब्ध आहेत. तसेच विश्व हॉस्पिटल बीड येथे सर्व सुविधांनी उपयुक्त असे तज्ञ डॉक्टरांच्या निगराणी खाली फिजिओथेरपी सेंटरही उपलब्ध आहे..शिबिराचे नाव नोंदणी करून घेण्यासाठी तात्काळ ०२४४२-२९५१५१



८२०८९५२४४२ या भ्रमणध्वनीवर संपर्क करून नाव नोंदणी करून घेण्याचे आवाहन न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर आणि मणिपाल हॉस्पिटल पुणे यांच्या वतीने केले आहे..!



**बीड – शिवरत्न जिवाजी महाले यांच्या पुण्यतिथी निमित्तान अभिवादन करताना प्रा.सनि भैय्या वाघमारे, संघर्ष ग्रुप अध्यक्ष सनि चांदणे, अमोल वाघमारे, शिवरत्न जिवाजी महाले सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तुषार दोडके, संतोष ससाने.**

# चालू बसचे उडाले टफ

नेकनुर / प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी निघालेल्या बस चा वरचा टफ चालत्या बसमध्ये निघाला, अशा खिळखिळ्या झालेल्या बस विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी एसटी महामंडळ वापरत असेल तर विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका आहे. ही बस बीड मुंडेवाडी येथून बाळनाथ विद्यालय चाकरवाडी , बळवंतराव कदम विद्यालय येळब घाट , जिल्हा परिषद शाळा वाघेबाबुळगाव , या ठिकाणच्या विद्यार्थ्यांची ने आण करणाऱ्या साठी जात असताना मंगळवारी नेकनूर - मांजरसुंभा महामार्गावरील रत्नागिरी फाट्या जवळ गाडीचा टप उडाला , सदरील गाडीत कोणीच नसल्याने धोका टळला असला तरी अशा खराब गाड्या विद्यार्थ्यांसाठी ने आण करण्यासाठी एस टी महामंडळ वापरत असेल तर विद्यार्थ्यांच्या जीव धोक्यात असल्याचे मत पालक व्यक्त करत आहेत,

परिवहन विभागाच्या काही बस या भंगार अवस्थेत निघाल्या आहेत. यामुळे चालकाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं प्रवाशांच्या आणि विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका असतो. आज बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ने - आण करणारी बस भंगार अवस्थेत असणारी बस आहे. शिवाय भंगारात जाण्याऱ्या बस रस्त्यावर धावत असल्यानं



प्रवाशांच्या जीवाला धोका असतो. परिवहन विभाग याला गांभीर्याने घेताना दिसून येत नाही. भंगार, नादुरुस्त बस रस्त्यावर एसटी महामंडळाच्या भंगार बसेसचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर येत आहे. एसटी महामंडळाच्या भंगार आणि नादुरुस्त बसेसमुळे अनेक ठिकाणी अपघातांच्या घटना घडत आहेत. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडली जाणारी बस भंगार अवस्थेतलीच बस आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी दररोज भंगार मधली बसच पाठवली जाते. या बस मधून विद्यार्थ्यांना जीवघेणा प्रवास सुद्धा करावा लागतो. कधी खिडकी नाही तर कधी त्या बसच्या खिडकीला काचे सुद्धा नाहीत. यामुळे लहान विद्यार्थी खिडकीमधून डोकावत सुद्धा असतात. परंतु आज शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी सोडल्या जाणारे बसचे वरील छतच उडून गेले आहे. यामुळे आता विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचणार नाहीत. शाळेच्या होणाऱ्या नुकसानीस परिवहन मंडळ जबाबदार राहणार का यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून शाळेसाठी कधी बस येते तर कधी नाही यासाठी अनेक वेळा संबंधित तिडके अधिकारी असणारे यांना शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर यांनी तक्रार केली असता त्यांनी या तक्रारीला केराची टोपली दाखवल्याचे सुद्धा शाळेचे मुख्याध्यापक यांनी बोलताना म्हटले आहे. सतत शाळेसाठी भंगार बस आणि नादुरुस्त बसच पाठवली जाते. जर एखाद्या वेळेस शाळेसाठी येणारी बस ना दुरुस्त असेल भंगार असेल आणि या बसमधून विद्यार्थी जर प्रवास करत असतील तर दुर्घटना घडलीच तर परिवहन महामंडळ जबाबदार राहणार का ? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानास कोण जबाबदार राहणार ? शाळेसाठी असल्या नादुरुस्त बस पाठवल्या तर विद्यार्थ्यांना या बस मधून जीव घेणा प्रवास करावा लागत आहे. एसटी महामंडळ अशा भंगार बसेस रस्त्यावर चालवून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत आहे का ?, असा संतप्त सवाल आता पुन्हा एकदा विचारल्या जाऊ लागला आहे. अशा बसेसमुळे प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. भंगार बस रस्त्यावरून धावतात.



## दोन दिवसांपूर्वी लग्न ठरलं, बहिणीला भेटायला आला, नाशिकमध्ये युवकाचा काळाने घात केला!

लग्न ठरल्यानंतर बहिणीला भेटायला आलेल्या २३ वर्षांच्या भावाचा हृदयद्रावक शेवट झाला आहे. नाशिकमध्ये घडलेल्या या घटनेमुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.नायलॉन मांजामुळे गळा चिरला गेल्यामुळे २३ वर्षांच्या सोनू धोत्रे याचा मृत्यू झाला आहे. रक्तबंबाळ अवस्थेमध्ये सोनूला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं.

मृत्यू झालेला सोनू धोत्रे आपल्या बहिणीच्या भेटीसाठी गुजरातहून नाशिकला आला होता, मात्र बहिणीची भेट होण्यापूर्वीच मांजाने त्याचा जीव घेतला. सोनीच्या अकस्मात मृत्यूने त्याच्या कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.दोनच दिवसांपूर्वी सोनूचं लग्न ठरलं होतं. मे महिन्यामध्ये त्याच्या लग्नाची तारीखही निश्चित झाली होती, त्यामुळे धोत्रे कुटुंबामध्ये आनंदाचं वातावरण होतं.

# पानिपत शौर्य स्मारकाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाचे सर्वोतोपरी सहकार्य - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा साकारणार
## पुतळा उभारणीसाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

मराठयांनी राष्ट्र संरक्षणार्थ पानिपतच्या युध्दात जीवाची बाजी लावून लढा दिला. या युद्धाच्या शौर्य स्मारकासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल,अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पानिपत येथे दिली.पानिपत युध्दाला २६४ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पानिपत येथील काला आम परिसरात आज मराठा शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले. मराठा वीर योद्ध्यांना अभिवादन करण्यासाठी गत १९ वर्षांपासून पानिपत शौर्य समितीच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

याप्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा तथा युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे राजशिष्टाचार तथा पणन मंत्री जयकुमार रावल, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, खासदार राजाभाऊ वाझे आणि हरियाणा



शासनाचे अधिकारी, स्थानिक नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या युध्द मोहिमेतून त्याकाळी बरेच काही शिकता आले. त्यानंतर झालेल्या अनेक मोहिमा मराठयांनी जिंकल्याच नाही तर अटकेपर्यंत झेंडा फडकविला. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला जाती पातीपलीकडे देशासाठी लढण्याची दिलेली शिकवण मावळयांनी पाळली आणि म्हणून दिल्लीचे तख्त मराठयांनी एका काळी राखले. ही एकीची शिकवण कायम ठेवून विकसित महाराष्ट्र आणि भारत घडवूया असेही ते म्हणाले.

या स्मारकासाठी अधिकची जमीन आवश्यक असल्याने त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे नमूद करुन या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळाही राज्य शासनातर्फे उभारला जाईल, अशी घोषणाही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी केली. यासाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक म्हणून काम पाहतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनीही मनोगते मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पानिपत शौर्य समितीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी केले. यावेळी. समितीच्यावतीने अमरावतीचे नितीन धांडे यांना शौर्यस्मारक पुरस्कार प्रदान करण्यातं आला.

# मंत्री धनंजय मुंडेंना धक्का!

मुंबई /प्रतिनिधी

संतोष देशमुख मर्डर प्रकरणानंतर फक्त बीडच नव्हे तर संपूर्ण राज्य हादरून गेलं आहे. मराठवाड्यातील अनेक भागात मोर्चे, आंदोलन सुरू आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींना मकोका लावण्यात आला आहे. काही आरोपी राष्ट्रवादीशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे राष्ट्रवादीची प्रतिमा मलिन होत असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठा निर्णय घेतला आहे. अजितदादांनी संपूर्ण बीड जिल्हा कार्यकारिणीच बरखास्त केली आहे. बीडमध्ये राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांचं वर्चस्व असून त्यांच्यासाठी हा मोठा धक्का असल्याचं बोललं जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बीड जिल्हा कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आहे. निलंबित तालुकाध्यक्ष विष्णू चाटे याच्यामुळे जिल्हा कार्यकारणी बरखास्त आली



## बीडची राष्ट्रवादीची संपूर्ण जिल्हा कार्यकारिणी बरखास्त
## संतोष देशमुख मर्डर प्रकरणानंतर मोठा निर्णय

आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये आरोपी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे केज तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांचं नाव आल्यानंतर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली होती.यामुळेच काल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसची जिल्हा कार्यकारणी बरखास्त केली आहे. तसेच तालुक्याची जी कार्यकारिणी होती, तीदेखील बरखास्त करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात विष्णू चाटे याचं नाव आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. विष्णू चाटे हे केजचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष होते, मात्र या गुन्ह्यात त्याचं नाव आल्यानंतर त्यांना तातडीने निलंबित करण्यात आलं होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील अनेक लोकांची चौकशीसुद्धा झाली, त्यांची तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर सुनील तटकरे यांनी हा महत्वाचा निर्णय घेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बीड जिल्हा कार्यकारणी बरखास्त करण्यात आली. जिल्हाध्यक्ष आणि तालुका अध्यक्षांची निवड होईपर्यंत जिल्हाध्यक्ष म्हणून राजेश्वर चव्हाण हेच काम पाहतील असं सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कळवण्यात आलं आहे. तसेच यापुढे तालुका अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष यांच्या चारित्र्याची पडताळणी करूनच नेमणुका कराव्या अशा सूचना बीड राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना देण्यात आल्या आहेत. काल उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांच्या उपस्थितीत बिड जिल्ह्याचे पक्षाचे अध्यक्ष राजेश्वर चव्हाण,माजी आमदार संजय दौंड आणि इतर प्रमुख पदाधिकारी यांच्यासोबत बैठक पार पडली. या बैठकीमध्ये बिड जिल्ह्यातील स्थानिक परिस्थितीचा आढावा अजित पवार यांनी घेतला. त्याचसोबत वाल्मिक कराड यांना मोक्का लागल्यानंतर परळी बंदची हाक देण्यात आली होती. अनेक हिंस्र आंदोलनं कार्यकर्त्यांकडून करण्यात आली होती,

## सातारा जिल्ह्यात आणखीन डझनभर आरपीआय पक्ष येणार: दादासाहेब ओव्हाळ

सातारा: दिनांक महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका संघटित व्हा व संघर्ष करा असा नारा दिला त्यामुळे एक सक्षम पिढी आपल्या बांधवांच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरली एक मोठा धबधबा राजकीय पटलावर निर्माण झाला हा इतिहास असला तरी सध्याच्या परिस्थितीमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या विस्ताराने राजकीय मंडळींना रिपब्लिकन या शब्दाशिवाय राजकारण करणे अशक्य झाल्यामुळे अनेक नवीन गट निर्माण झाले त्यामुळे आता सातारा जिल्ह्यात या नवीन वर्षात आणखीन डझनभर रिपब्लिकन पक्षाचे गट तयार होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे चारित्र्य वैचारिक बैठक व बुद्धिमत्ता होती त्यामुळे डॉक्टर आंबेडकर या नावाबद्दल प्रचंड प्रमाणात आदरयुक्त भीती होती हाच धागा पकडून डॉक्टर आर डी भंडारे राजाभाऊ खोब्रागडे भिशी कांबळे कर्मवीर दादासाहेब गायकवाड राजू गवळी दादासाहेब रुपवते पीएन राजपूत बालकृष्णन अशी शेकडो कार्यकर्त्यांची फौज उभी होती त्यामुळेच सत्तरच्या दशकात एक नवी पिढी प्रेरणा घेऊन रिपब्लिकन पक्षाची जोडली गेली आज खऱ्या अर्थाने राजकीय पटलावर रिपब्लिकन पक्षाचे पानिपत झालेले आहे तरीसुद्धा नवीन गट उदयास येत आहे.. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी राजकीय पक्षाची निर्मिती होणे गरजेचे आहे परंतु आज आपले उपद्रव्य मूल्य आपल्याच बांधवांना दाखवण्यासाठी जेव्हा एखादा गट निर्माण होतो त्या वेळेला शत्रू वरती हल्ला करण्यापेक्षा स्वकीयांवरच हल्ला करण्यामध्ये धन्यता मानणारे गट व त्यांना मिळणारी मुठभराची साथ आता चर्चेचा विषय झालेले आहे ज्यांना स्वतःच्या वार्डामध्येही कोण ओळखत नाहीत असे मंडळी



आपल्या खांद्यावरती संपूर्ण सातारा जिल्ह्याचा भार वाहत आहेत एवढेच नव्हे तर काही भाव भाग भारत बंदची घोषणा देत आहे खरंच त्यांची क्यू करावी वाटत आहे. निष्ठा,तत्व, यापेक्षा स्वार्थला ला जास्त किंमत दिली जाते. आज दलित वस्ती सुधार योजना किंवा समाज कल्याण च्या अनेक शासकीय योजना न राबवताही निधी लाटला जात आहे दलित वस्तीच्या नावाने प्रस्थापित ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम करत आहे ह्याच निकृष्ट दर्जाच्या ठेकेदारांच्या पैशावरती संघटना चालवणाऱ्या काही स्वयंभू नेते गण स्वतःचीच विकसित केलेली प्रणाली वापरत आहे. कार्यकर्ते नको पण नेत्यांना आवरा अशी म्हणण्याची पाळी आंबेडकर अनुदान वरती आणलेले आहे खरं म्हणजे एका गटात काम करायचं आणि सहा महिन्यांमध्ये तो गट सोडून, दुसऱ्या गटात जायचे असा पाठ शिवनी चा खेळ सुरू झालेला आहे भविष्यात दलित्यांवरून होणाऱ्या अन्यायाबाबत आता प्रश्न एक पण नेत्यांच्या निवेदनाचीच गर्दी प्रसारमाध्यमाच्या कार्यालयात दिसू लागलेली आहे एखादी घटना दुर्दैवी असू शकते पण पराचा कावळा करून आपली संघटना कशी प्रसार माध्यमात दिसेल आणि ते जर शक्य नसेल तर बॅनरबाजी करून जे कोणी त्या बॅनर कडे पाहत नाही त्या ठिकाणी बॅनर लावून काय नेमके साध्य होणार याचा आता जॉब जनता विचारू लागलेले आहे त्यामुळे भविष्यात आणखीन डझनभर गट वाढले तर नवल वाटणार नाही अशी बोलकी प्रतिक्रिया उमटू लागलेली आहे

### परभणी गॅस सिलेंडर स्फोट प्रकरणी
## दोन अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल

सीसीटीव्ही फुटेजआधारे आरोपींचा शोध सुरू

परभणी/ जिंतूर प्रतिनिधी

शहरातील वसमत रस्त्यावरील शिवशक्ती अपार्टमेंटसमोर मातोश्री वडापाव स्टाँलवरील दोन गॅस सिलेंडर्सचा शनिवारी दि.११ जानेवारी मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास १० मिनिटांच्या अंतराने एका पाठोपाठ स्फोट झाला. दोन अज्ञात व्यक्तींनी खोडसाळपणाने ज्वलनशील पदार्थ टाकून वडापावच्या स्टॉलला आग लावल्याचे तपासात समोर आल्याने या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वडापाव स्टॉलमधील दोन्ही सिलेंडरचा स्फोट झाला त्यावेळी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली



नाही. मात्र संबंधित व्यावसायिकाचे ७० हजाराचे नुकसान झाले आहे. वडापाव स्टॉल चालक रवि मोरे हा शनिवारी रात्री आपले व्यवहार आटोपून घरी गेला होता. परंतु रात्री सव्वा बाराच्या सुमारास हातगाड्यावरील स्टॉलमधील एका सिलेंडरचा अचानक मोठा स्फोट झाला. त्या स्टॉल मधील दुसर्या सिलेंडरचा त्यापाठोपाठ दहाव्या मिनिटाने मोठा स्फोट झाला. त्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली .

वसमत रस्ता परिसर स्फोटाच्या प्रचंड आवाजाने दणाणून गेला होता. सुदैवाने स्टॉलवर व परिसरात कोणीही नव्हते. या आगीत स्टॉल पूर्णतः जळून खाक झाल्याने ७० हजाराचे नुकसान झाल्याचे रवि मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे. नवा मोंढा पोलीस ठाण्यात दोन अज्ञात व्यक्तींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसमत रोडवरील सीसीटीव्ही फुटेजआधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# वाल्मीक कराड ला दिलेले नाहरकत प्रमाणपत्र नगर पंचायतकडुन रद्द,नगर पंचायतने ठराव घेतला

केज/प्रतिनिधी

केज नगरपंचायत कार्यालयाने दि.२ जानेवारी २०२५ रोजी वाल्मीक कराड यांना दिलेले नाहरकत प्रमाणपत्र केज नगर पंचायत कडुन ठराव घेऊन रद्द करण्यात आले आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की,दि.२ जानेवारी २०२५ रोजी नगर पंचायत कार्यालयाने वाल्मीक कराड यांना वाईन शापसाठी नगर पंचायत कार्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र दिले होते परंतु याची प्रसिद्धी कोणत्याही वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्यात आली नव्हती त्यामुळे नगर पंचायत कार्यालयात नगराध्यक्षा सौ.सितातार्इ बनसोड



यांच्या अध्यक्षते खाली बैठक घेऊनदिलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचा ठराव घेतला असल्याची माहीतीगटनेते हारुणभाई ईनामदार यांनी दिली आहे. याप्रकरणी शेतकरी कामगार पक्ष,तसेच केज तालुका बिअरबार,बिअर शापी,देशी दुकान असोशिएशन यांच्या वतीने निवेदन देण्यात आले होते.तसेच ना हरकत प्रमाण पत्र देतात असोसिएशनला विचारात घेऊन नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.या निवेदनावर श्रीहरी जाधव अध्यक्ष,शंकर तपसे उपाध्यक्ष,अमोल पोपळे कोषाध्यक्ष,विलास सोनवणे सचिव यांच्या सह्या आहेत.दरम्यान या निर्णयाचे असोशिएशन च्या वतीने समाधान व्यक्त केले

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

केज/प्रतिनिधी

दि.१२ जानेवारी २०२५ रविवार रोजी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे व मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम यांनी प्रतिमा पुजन करुन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इयत्ता ७ वी ची विद्यार्थिनी प्रियंका अशोक देटे व प्रमुख पाहुणे म्हणून इयत्ता ६ वी चीविद्यार्थिनी श्वेता सुहास सरवदे,नेहा सतिश माने या होत्या.राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा जन्म दि.१२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील भुईकोट राजवाड्यात झाला. वडील लखुजी जाधव व आई म्हाळसादेवी ऊर्फ गिरजाबाई हे होत.त्या छत्रपती शिवाजी राजे भोसले यांच्या आई व शहाजी राजे भोसले यांच्या पत्नी होत्या.हिंदवी स्वराज्यनिर्मिती करण्यात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना उपदेश दिला व वेळोवेळी मार्गदर्शन केले.स्वामी विवेकानंदांचा जन्म कोलकाता येथे दि.१२ जानेवारी १८६३रोजी झाला.वडील विश्वनाथ दत्त होते वआई भुवनेश्वरी दत्त होत्या.ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते. त्यांचे मुळ नाव नरेंद्र होते. त्यानी हिंदु धर्माबाबत विशेष माहिती अमेरिकेत पटवून हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व पटवून दिले.तसेच युवकांना विशेष मार्गदर्शन केले.अशी माहिती या शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम यांनी दिली.यावेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्तकेले.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे, उपाध्यक्ष सीमा मोहिते, सदस्य,तरनळी ग्राम पंचायत सरपंच महादेव खेडकर,उपसरपंच शिवाजी मोहिते,राधा आक्का खामकर,शिक्षक भारत हांगे,बाळासाहेब राठोड,बाबासाहेब मैंद, शिक्षिकाश्रीमती गिताताई अंडील मॅडम,श्रीमती सोनाली भुमकर मॅडम,




शापोआ कामगार गणेश काशिनाथ माने उपस्थित होते.राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या वेषात विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इयत्ता ७ वी ची श्रध्दा संपत्ती सरवदे यांनी केले व इयत्ता ६ वी ची विद्यार्थीनी श्वेतासुहास सरवदे यांनी कार्यक्रमास उपस्थितांचे आभार मानले.यावेळी शाळेतील शिक्षिकांना श्री.राजाभाऊ कदम मुख्याध्यापक यांनी शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन व विद्यार्थ्यांना व सर्व उपस्थितांना गोड पदार्थ खाऊ म्हणून वाटप केला व कार्यक्रम संपन्न झाला.

# सरस्वती महाविद्यालयात विद्यापीठ नाम विस्तार दिन साजरा

केज/प्रतिनिधी

उपेक्षित,वंचित,गरीब, मजूर,शेतकरी यांच्या प्रवाहाबाहेरीलविद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची द्वारे मराठवाड्यासारख्या अविकसित भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यमातून खुली केली. मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हा नाम विस्तार दलित, उपेक्षित आणिबहुजनांचा विचाराचा विजय असल्याचे प्रतिपादन प्राचार्यडॉ.हनुमंत सौदागर यांनी केले.ते सरस्वती महाविद्यालय केज येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विस्तार दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम पाटील हे होते.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. गौतम पाटील म्हणाले की,विद्यापीठाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे ही फक्त बाबासाहेबांना नव्हे तर विद्यापीठासाठी अत्यंत गौरवाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमास प्रा. डॉ.आहेर,प्रा.डॉ.चाटे,प्रा. डॉ.शिंदे,प्रा.डॉ.आरडले, प्रा.डॉ.वराळे,प्रा.डॉ. कराळे आदींची उपस्थिती होती.सूत्रसंचालन प्रा.डॉ. किरणकुमार धिमधिमे तर आभार प्रा.डॉ.सारिका बुरगे यांनी मानले.यावेळी प्राध्यापक वृंद,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



# शिवसंग्रामच्या दणक्याने नगर रोडच्या कामास गती

## शहर उपाध्यक्ष नदीम गणी यांनी दिला होता आंदोलनाचा इशारा

बीड (वार्ताहर)

**शहरातून जाणाऱ्या बीड नगर रस्त्याचे काम अगोदरच संथगतीने चालू असतानाच संबंधित यंत्रणेने नोटीस दिली असतानाही नगरपालिका प्रशासनाने बालेपीर रोडवरील पाईप न हलवल्याने रस्ता कामास अडथळा निर्माण होऊन उशीर होत होता.या संदर्भात शिवसंग्रामचे शहर उपाध्यक्ष शेख नदीम गणी यांनी पाठपुरावा करून आंदोलनाचा इशारा दिला होता.**

बालेपीर परिसरातील रोडचे काम खोदकामातील पाईप हटवण्याच्या अनुषंगाने थांबवण्यात आलेले होते. नगरपालिका प्रशासनास याबाबत संबंधित यंत्रणांनी कळवले असतानाही त्यांनी कुठलीच कार्यवाही केली नव्हती. याबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकारी कर्मचारी उडवा उडवीची उत्तरे देत होते. यावेळी शिवसंग्रामचे शहर उपाध्यक्ष शेख नदीम गणी यांनी योग्य पाठपुरावा करत बीड नगर रोडवरील बालेपीर येथील खोदकामात अडथळा होत असलेले पाईपलाईन हटवण्यास नगरपालिका प्रशासनास वेळ मिळेल का? असा प्रश्न उपस्थित करून शिवसंग्राम स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. याची दखल घेत नगरपालिका प्रशासनाने नगर रोडवरील पाईप लाईन वेळेत हटवल्याने संथ गतीने चालू असलेल्या नगर रोडवरील रस्त्याचे कामास गती प्राप्त झाली आहे. शिवसंग्रामच्या इशाऱ्यानंतर सुरू झालेल्या कामाबाबत बिडकरांनी समाधान व्यक्त केले आहे.




# पुढील मकर संक्रांतीपर्यंत ठाकरे-फडणवीस एकत्र

## आमदार रवी राणांचा मोठा दावा, म्हणाले - देवेंद्रजींना भेटून ठाकरे एक पाऊल पुढे आलेत

पुढील मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दिसतील, असे वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे. रवी राणा यांच्या या विधानामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खा आणि गोड गोड बोलावे अशी विनंती आहे, असेही रवी राणा यांनी म्हटले.

राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून भाजप आणि ठाकरे गटाची जवळीक वाढत असल्याचे दिसून येत आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तर आदित्य ठाकरे हे देखील आतापर्यंत तीन वेळा देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी गेले होते. शिवाय ठाकरे गटाच्या 'सामना'मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आले. तसेच उद्धव ठाकरे



माझे शत्रू नाहीत, असे विधान फडणवीसांनी केले होते. या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना रवी राण यांनी उपरोक्त मोठा दावा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.


काय म्हणाले रवी राणा?

राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खावे आणि गोड गोड बोलावे अशी विनंती असल्याचे रवी राणा म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांना भेटून उद्धव ठाकरे एक पाऊल पुढे आले आहेत असे म्हणत पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांसोबत दिसतील, असा दावा रवी राणा यांनी केला. मोदींचे नेतृत्व उद्धव ठाकरेंनी खुल्या मनाने स्वीकारले तर नक्कीच हे होईल, असा विश्वासही राणा यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुढे जाणार आहे. त्यांच्यात नेतृत्वात आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा- युवा स्वाभिमान पक्ष रिंगणात उतरेल. कुठल्याही निवडणुकीत आम्ही एकत्रित राहू असेही आमदार रवी राणा यांनी सांगितले.

राजकारणात आज शत्रू असणारा उद्या मित्र होतो

मागील अनेक दिवसांच्या घडामोडी पाहता उद्धव ठाकरेंची भूमिका बदलतीये का असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत अमृता फडणवीस यांनीही भाष्य केले. नेत्यांमध्ये असणारे मतभेद हे विचारधारांबाबत आहेत. त्यांच्या वैयक्तिक पातळीवर ते मतभेद नाहीत. वैचारिक मतभेद असल्याने राजकारणात एकेकाळचा शत्रू असणारा हा मित्र होतो, मग परत शत्रू होतो, परत मित्र होतो अशी कितीतरी उदाहरणे आहेत, असे सूचक विधान अमृता फडणवीस यांनी केले होते.

# नायलॉन मांजा अखेर पोलिसांच्याच गळ्यावर; पीएसआयचा गळा कापला, प्रकृती गंभीर




छत्रपती संभाजीनगर : कर्तव्यावर निघालेल्या पीएसआयचा नायलॉन मांजामुळे गळा कापला गेला. बीड बायपास परिसरातील सुधाकरनगर मध्ये सकाळी दहा वाजता घडलेल्या घटनेत पीएसआय गंभीर जखमी झाले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी सचिन पारधे हे स्थानिक गुन्हे शाखेत अधिकारी आहेत. मंगळवारी सकाळी दहा वाजता ते नेहमीप्रमाणे कर्तव्यावर दुचाकीने निघाले होते. सुधाकर नगर मधून जात असतानाच अचानक मांजाने त्यांचा गळा कापला गेला. स्थानिकांनी धाव घेत त्यांना तत्काळ एका खाजगी रुग्णालयात दाखल केले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, ही घटना इतकी गंभीर होती की पारधे यांच्या गळ्याला मांजा लागताच रक्ताच्या धारा निघाल्या. दुचाकीवरून तोल जाऊन ते खाली कोसळले. मांजा त्यांच्या गळ्यामध्ये अक्षरशः रुतला होता.

तातडीने शस्त्रक्रिया

शहानुरमिया दर्गा परिसरातील एका खाजगी रुग्णालयात पारधे यांच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार त्यांची प्रकृती अद्यापही चिंताजनक आहे.

### ३१ गुन्हे तरीही मांजा सुसाट

शहर पोलिसांनी गेल्या दीड महिन्यांमध्ये ३१ गुन्हे दाखल करत ४०० पेक्षा अधिक रील जप्त केल्या. मात्र तरीही शहरात सोशल मीडिया व ऑनलाइन वेबसाईट वरून नायलॉन मांजा खरेदी करण्यात आला. या बेजबाबदार नागरिकांमुळे जवळपास ४० पेक्षा अधिक नागरिक आत्तापर्यंत गंभीर जखमी झाले आहेत.




## मेड - एक्सेलंसं मध्ये NEET, १२ वी च्या विदयार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

बीड येथील मेड-एक्सलन्स क्लासेस मध्ये NEETची तयारी करणाऱ्या इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ संपन्न झाला. या वेळी विद्यार्थ्यांना शेख आलीया सिद्दीखा रिटायर्ड मुख्याध्यापिका, हसनाद सर, समीर फारोकी रेहनुमा क्लासेस मुजाहेद सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या समारंभासाठी बागवान नसरीन मॅडम व खान मेहजबीन मॅडम अपस्थित होत्या. यावेळी पाहुण्यांचे क्लासेसचे संचालक विखार सर, शेरकर सर आणि शोएब सर यांनी आभार व्यक्त केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन उत्साहात साजरा

## बहुजन विकास मोर्चाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

परळी ।प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन परळी शहरातील भीमवाडी, रोडे चौकात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत बहुजन विकास मोर्चाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.नामविस्तार दिनानिमित्त रोडे चौकात जेष्ठ नेते अनिल मस्के व कामगार नेते आर.एच.व्हावळे व माजी नगरसेवक महेंद्र रोडे यांच्या हस्ते




ध्वजारोहण करण्यात आले.तसेच उपस्थित मान्यवर नामांतर लढ्यातील योध्दा यांच्या हस्ते विद्यापीठ कमानीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी नामांतर लढ्यातील योध्दे सोपान ताटे, सुरेश रोडे,माजी नगरसेवक महेंद्र रोडे.माजी नगरसेवक रवी मुळे,बहुजन विकास मोर्चा परळी तालुका अध्यक्ष मनोहर मुंडे,एकतावादी रिपाईचे शहराध्यक्ष सुनील कांबळे, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, प्रदीप भोकरे, भगवान गायकवाड, जेष्ठ मार्गदर्शक कांबळे,वाले आदी उपस्थित होते.दरम्यान बहुजन विकास मोर्चाच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

# सीईडी इंडिया फाऊंडेशनचा ५ स्टार रँकिंग A++ पुरस्काराने न्यू व्हिजन पब्लिक स्कुल सन्मानीत

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल या शैक्षणिक संस्थेस उएऊ इंडिया फाउंडेशन यांच्या द्वारे देण्यात येणारा शैक्षणिक संस्था साठी अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा २०२४-२५ चा ५ स्टार रँकिंग -++ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नुकताच दि १२ जाने रोजी रेडिसन ब्लू हॉटेल ,नवी दिल्ली येथे हा पुरस्कार पदमश्री प्रो डॉ दिनेश सिंग (चान्सलर, के आर मंगलम युनिव्हर्सिटी, हरियाणा) व डॉ श्रीधर श्रीवास्तव (सहसंचालक एन सी ई आर टी) यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरित करण्यात आला. हा पुरस्कार न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे प्राचार्य रेंजो आर चंद्रन यांनी स्वीकारला.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाईच्या वतीने सदैव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारचे शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील असते . त्यासाठी आवश्यक सर्व त्या भौतिक तथा शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांमध्ये समाज जागृती व प्रगती व्हावी या हेतूने सतत संस्था प्रयत्नशील असते . संस्थेचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोचावे यासाठी संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी , कार्यकारी




संचालक संकेत मोदी यांच्यासोबतच संस्थेचे प्राचार्य तथा सर्व शिक्षक हे मेहनत घेत असतात. याचेच फलित म्हणून आज न्यू व्हिजन पब्लिक स्कूलला (उएऊ खपवळर षेौपवरींळेप) सी ई डी इंडिया फाउंडेशन यांच्याद्वारा देण्यात येणारा अत्यंत महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा असा स्टार रँकिंग वार्ड २०२४-२५ साठी ५ स्टार रँकिंग -++ हा पुरस्कार प्राप्त झाला. रेडिसन ब्लू हॉटेल नवी दिल्ली येथे सन्मानपूर्वक देण्यात आला . संस्थेतून आपले शिक्षण पूर्ण करून आजपर्यंत शेकडो विद्यार्थी देशभरात मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. ज्यामध्ये डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक याचबरोबर मोठ्या उद्योग धंद्यात आपले , आपल्या संस्थेच्या सोबतच देशाचे नाव उज्वल करत आहेत. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने निवासी मतिमंद, मूकबधिर तथा दिव्यांग विद्यालय तसेच मातोश्री वसतिगृह त्याचबरोबर घाट नागनाथ प्राथमिक विद्यालय, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय , फार्मसी महाविद्यालय, बी सी ए महाविद्यालय या व अशा विविध शैक्षणिक संस्था अंबाजोगाई शहरात हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत.

या पुरस्कारासाठी संपूर्ण देशभरातून १४५६ शाळांनी आपला सहभाग नोंदवला होता. यापैकी १०३ शाळांना ग्रीन स्कूल या कॅटेगरी मध्ये हा पुरस्कार मिळाला . या पुरस्कारा साठी शाळेची निवड करतांना शाळेचा मागील तीन वर्षाचा एकूण निकाल , शाळेची इमारत, शाळेतील शैक्षणिक सुविधा व त्यांचा वापर , निसर्गरम्य परिसर , शाळेचे क्रिडांगण इत्यादी मानदंडाचा विचार करून संस्थांची निवड करण्यात आली . या पुरस्कार प्राप्तीसाठी संस्थेचे संस्थापक राजकीशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक डॉ .डि.एच. थोरात ,प्रा. वसंत चव्हाण , डॉ . बी . आय . खडकभावी , प्रा सुरेश बिराजदार , यांनी संस्थेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन , संस्थेचे सर्व शिक्षक , विद्यार्थी, पालक यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## मकोका गुन्ह्यातील आरोपी संदर्भात बीड कोर्टात आंदोलन करणाऱ्या कराड आणि देशमुख समर्थक आंदोलकांवर गुन्हे दाखल

बीड /प्रतिनिधी

मकोका गुन्ह्यातील आरोपीस आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालयातील विशेष मकोका कोर्टात हजर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने बोड जिल्हा न्यायालय परीसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला होता. आरोपीस कोर्टात हजर केल्यानंतर पोलीस वाहनांतून १६.४० ते १७.०० वा. दरम्यान परत बाहेर घेवून जात असताना बीड कोर्टाचे परीसरात १) सुनिल श्रीरंग फड वय ५० वर्षे, रा. परळी वैजीनाथ, ता. परळी जिल्हा बीड २) ज्ञानोबा दगडू मुंडे वय ३६ वर्षे.रा. उखळी ता. गंगाखेड, जिल्हा परभणी, ३) जिवन माणिक कराड वय ३० वर्षे रा. पिराचीवाडी ता. केज, जि. बीड व इतर अनोळखी ३० ते ३५ यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन वाल्मीक कराड यांच्या वरील खोटा गुन्हा मागे घ्यावा अशी घोषणाबाजी करुन जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याबाबत विलास श्रीमंतराव मोरे वय ३९ वर्षे, व्यवसाय नोकरी सहाय्यक पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं.२९/२०२५ बी.एन.एस.एस. कलम १३२, २२१, १८९ (२), १८९(३), १९१(२). १९० सह म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून तपास चालु आहे.

तसेच बीड कोर्टाचे परीसरात १) हेमा श्रीहरी लोमटे (पिंपळे) रा. स्वराज्य नगर, बोड २) मनिषा गंगाधर कुपकर रा. अंबीका नगर, बीड ३) संगीता कोकाटे व इतर १० ते १२ महीला यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन संतोष देशमुख यांचे मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहीजे अशी घोषणाबाजी करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केल्या बाबत निता गजानन दामधर महीला पोलीस उपनिरीक्षक, शिवाजीनगर पोलीस स्टेशन यांचे फिर्यादीवरुन गु.र.नं.३०/२०२५ बी.एन.एस.एस. कलम १३२, २२१, १८९ (२), १८९(३), १९१(२), १९० सह म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन तपास चालु आहे.

तरी बीड पोलीसांकडून सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, सध्या बीड जिल्ह्यात मा.जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेश लागू असून कोणीही गैरकायदेशीर जमाव जमवुन बेकायदेशीरपणे आंदोलन करुन सार्वजनीक शांतता भंग होईल असे कृत्य करु नये तसेच दोन समाजात तेढ निमर्माण होईल अशा प्रकारचे वक्तव्य प्रत्यक्ष अथवा सोशल मिडीयावर करु नये अथवा आक्षेपार्ह मजकुर लिहू नये असे आढळून आल्यास प्रचलीत कायद्यान्वये संबंधीता विरुध्द गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.असे जाहीर आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## शासकीय रेखाकला परीक्षा (इंटरमेजिएट,चित्रकला) २०२४ च्या परीक्षेत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील चैत्राली करपुडेचे राज्यस्तरावर यश

खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचा १००% निकालाची परंपरा कायम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत कला संचालनालय मुंबई तर्फे घेण्यात येणा-या शासकीय ग्रेड परीक्षा (चित्रकला) २०२४ चा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून यात चैत्राली करपुडे इ.९वी या विद्यार्थिनीने महाराष्ट्रात पन्नासावा क्रमांक पटकावला आहे.जिल्हा परिषद केंद्र १३१००२ या केंद्रावर ७६ विद्यार्थी या परीक्षेस प्रविष्ट झाले होते.त्यापैकी - ग्रेड मध्ये २६,आदित्य कावळे,अमृता हेडे,अनिकेत गित्ते,अंजली पांचाळ,अनुष्का बिंरगे,अरूधंती देशपांडे, धनश्री बडे,गार्गी चाटे,गौरव जैन,जयश्री केंद्रे,कौस्तुभ मातेकर,क्षितीजा धायगुडे, लावण्या देशपांडे,माहेश्वरी भताने,परिक्षीत पाखरे,प्रिया माळी,प्रियल जोशी,साक्षी जाधव,संस्कृती कापसे,श्रेया दिंडोरे,श्रीकृष्ण माने,सुमेधा शेप,स्वराली महाजन,तनस्वी चौरे,वेदिका कदम इ ग्रेड मध्ये २३ तर उ ग्रेड मध्ये २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाचा शेकडा निकाल १००% लागला आहे.वरील विद्यार्थ्यांना कला शिक्षक उमेश डोंगे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

वरील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,

माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्षडॉ.अतुल देशपांडे,मुख्याध्यापक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे,शालेय समितीचे सर्व सदस्य,उपमुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. महाराष्ट्रातील टॉप १०० विद्यार्थ्यांच्या यादीत खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु .चैत्राली शिवदास करपुडे ९वी ई या विद्यार्थिनी चा ५० वा क्रमांक तीच्या या नेत्र दीपक यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

## ‘उमेद’ च्या वतीने बीडमध्ये एकाच छताखाली विविध वस्तूं व खाद्यान्न विक्रीचे प्रदर्शन

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे मिनी सरस दिनांक १६ जानेवारी २०२५ ते २० जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण , जिल्हा परिषद समोर ,बीड याठिकाणी सकाळी ९.०० ते रात्री १० वाजेपर्यंत ‘उमेद’ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा , जिल्हा परिषद बीड अंतर्गत आयोजित करण्यात आलेले असून या अभियानातर्गत ,बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात इंटेन्सीव पद्धतीने दारिद्र्य निर्मुलनाचे प्रभावी पणे काम सुरु आहे.

स्वयंसहाय्यता समूहांना शासनाने वितरीत केलेल्या खेळते भांडवल , समूह गुंतवणूक निधी तसेच बँक कर्ज या माध्यामातून महिलांनी विविध उद्योग व्यवसायाची निर्मिती केली आहे . स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्य महालक्ष्मी सरस व जिल्हास्तरावर जिल्हा मिनी सरस प्रदर्शनाचे भव्य आयोजन करण्यात येते त्यानुसार बीड जिल्ह्याचे मिनी सरस आयोजित करण्यात आले आहे. बीड जिल्हातील उमेद अभियानातर्गत कार्यरत स्वयं सहाय्यता समुहातील होतकरू महिलांनी तयार केलेले उत्पादित मालाच्या मराठवाड्यातील विविध आकर्षक वस्तू - मसाले , चटण्या ,पापड ,लोणचे,येसूर , आवळा कॅन्डी , गृहपयोगी वस्तू ,हस्तकला ,लाकडी वस्तू , लोकरीच्या वस्तू , शोभेच्या वस्तू , विविध खाद्य पदार्थ खमंग , स्वादिष्ट शाकाहारी व मांसाहारी घरगुती पद्धतीने तयार केलेले गावरान जेवण ,दही धपाटे या सह अनेक नानाविध प्रकारांच्या वस्तूंचे एकाच छताखाली विक्रीचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे व विक्रीला अधिकाधिक प्रोत्साहित करणेकरीता विविध वस्तूंचा सामावेश असून या वस्तू वैशिष्टपूर्णच नाहीत तर उच्च दर्जाच्याही आहेत. या प्रदर्शनात ग्रामीण भागातील कारागिरांचे कौशल्य आणि कारागिरीचे प्रदर्शन करतात . जिल्ह्यातून ११ तालुक्यातील ७५ौंश्र्र विविध गटांच्या माध्यमातून अस्सल ग्रामीण स्वादिष्ट पदार्थ चाखण्याची आणि खरेदी करण्याची नागरिकाना संधी देतील. ग्रामीण भारतातील खाद्यसंस्कृती आणि नाविण्यपूर्ण उपक्रम साजरे करून गरीबातील गरीब कुटुंबाचे जास्तीत जास्त विक्री च्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होवून जीवनमान उंचावून उद्योजक होवून विकासात महत्वाचे योगदान मिळवून देणे तसेच शालेय विद्यार्थ्यांचे मनोरंजनात्मक व विविध सांस्कृतिक

कार्यक्रम सुद्धा होणार असून या प्रदर्शनात जास्तीत जास्त नागरिकांनी ,सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी सह कुटुंब व सहपरिवारासह भेट देवून स्वयं सहाय्यता गटातील महिलांनी तयार केलेले वस्तूंची खरेदी करून प्रत्याहित करून मोठ्या संखेने सहभाग नोंदवून प्रदर्शनाचा आनंद घ्यावा असे आवाहन माननीय श्री . आदित्य जीवने (भा.प्र.से. )जिल्हा अभियान संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद ,बीड व माननीय श्रीमती संगीतादेवी पाटील जिल्हा सहअभियान संचालक तथा प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्राणा बीड यांनी केले असून सदरील प्रदर्शन हे राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष नवी मुंबई यांचे सुचने नुसार आयोजित करण्यात येत असल्याची माहिती श्री. शकील शेख जिल्हा व्यवस्थापक यांनी दिली आहे.

## मनोज जरांगे,आ.सुरेश धस,खा. बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदिप क्षीरसागर यांची बदनामी केल्याने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेकाने चोख प्रत्युत्तर

आष्टी (प्रतिनिधी)

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील,अन्याया विरुद्ध वेळोवेळी आवाज उठवणारे आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेवर जोडे मारो आंदोलन करून या नेत्यांची बदनामी केली असल्याने पुणे,बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणी या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून प्रत्युत्तर देण्यात आले आहे याबाबत अधिक माहिती अशी की, काल परळी शहरात चौकशीअंती वाल्मिक कराड याला मकोका या कायद्यान्वये विशेष चौकशी समितीने ताब्यात घेतल्यामुळे वाल्मीक कराड समर्थकांकडून बीड जिल्ह्यात संचारबंदी कायदा १४४ लागू असतानाही आरोपींच्या बाजूने चुकीच्या पध्दतीने समर्थन करून आरोपीना शिक्षा व्हावी ही सतत मागणी करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेला काळे फासून




निषेध व्यक्त करत जोडे मारो आंदोलन केले आणि या निंद्य प्रकाराचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून या सर्व नेत्यांची बदनामी केल्यामुळे स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व सर्वसामान्य लोकांच्या भावना दुखावल्या आहेत...

काल परळी मध्ये जो निंदनीय प्रकार आरोपीच्या समर्थनार्थ घडला असून सर्व दोषींवर योग्य ती काय कायदेशीर कठोर कारवाई करावी यापुढेही असा प्रकार होणार नाही.या मागणीसाठी आष्टी मतदार संघातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येत निषेध व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी संघर्षयोद्धा मनोज जरांगे, आ.सुरेश धस, खा. बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या अशा घोषणाबाजी करत अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या नेत्यांना समर्थन दिल्याचे पाहायला मिळाले. यावेळी आष्टी पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री शरद भुतेकर यांना आणि आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळकृष्ण पाटील हणपुडे यांच्याकडे मनोज रंगे पाटील आमदार सुरेश धस खासदार बजरंग सोनवणे आमदार प्रकाश सोळंके आणि आमदार संदीप क्षीरसागर यांची बदनामी करणाऱ्या या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी या मागणीचे स्वाक्षऱ्या केलेले निवेदन दिले..

## छत्रपती संभाजीनगर येथे नामविस्तार दिन उत्साहात साजरा



बीड/प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी नामविस्तार दिनानिमित्त प्रमुख उपस्थिती मध्ये चंद्रकांतजी हंडोरे राज्यसभा खासदार, शशिकांत बनसोडे प्रदेशाध्यक्ष,भीमशक्ती सामाजिक संघटना संतोष भिंगारे,मराठवाडा अध्यक्ष,भीमशक्ती सामाजिक संघटना,राजू मंजुळे जिल्हाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर,मिलींद दाभाडे गटनेता महानगर पालीका,चंद्रकांत खरात सर मराठवाडा संघटक, डॉ.अमरेंद्र विद्यागर जिल्हाध्यक्ष बीड,सुनील धिमधिमे प्रसिद्धीप्रमुख बीड तसेच भीमशक्ती सामाजिक संघटनेचे इतर पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.यावेळी नामविस्तार दिनानिमित्त मान्यवरांची भाषणे झाली त्यानंतर नामविस्तार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## एमएमए राष्ट्रीय एलिट कॉम्बॅट २०२५ मध्ये बीडच्या शेख रबी अहमदला कांस्य पदक

अजमेर (वार्ता)

ऑल इंडिया मिक्स्ड मार्शल आर्ट्स फेडरेशन अधिकृत राष्ट्रीय एलिट कॉम्बॅट २०२५ अजमेर राजस्थान मध्ये, तीन दिवसीय स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी पॉइंट टेबलनुसार बीड महाराष्ट्रच्या फायटर मिलिया सीनियर कॉलेजचा विद्यार्थी शेख रबी अहमद अब्दुल रहीम याला कांस्य पदक देण्यात आले. हरियाणा मेवातच्या ऋषीविरुद्धच्या अटीतटीच्या सामन्यात त्याने १० ते ९ गुण मिळवले. हे स्पर्धा १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान बेटल फिल्ड टर्फ, पुष्कर रोड, लक्ष्मी पॅलेस जवळ अजमेर येथे आयोजित करण्यात आले होते. पहिल्या फेरीत असताना शेख रबी अहमदला १० तर ऋषीला ८ गुण मिळाले. ऋषीने रबीवर टीकेओकडून गुण घेतले. त्यानंतर ऋषीला रौप्य आणि रबी अहमदला कांस्यपदक देण्यात आले. उपांत्य फेरीच्या सामन्याच्या शेवटी हा निर्णय घेण्यात आला. अंतिम सामन्यात हरियाणाच्या ऋषी याने दिल्लीच्या ऋषिकांतला गंभीर दुखापत होऊनही रौप्यपदक जिंकण्यात यश मिळविले, तर दिल्लीच्या ऋषिकांतने सुवर्णपदक पटकावले.

नॅशनल एमएमए फेडरेशनने आयोजित केलेल्या या एलिट कॉम्बॅटमध्ये देशभरातील विविध राज्यांतील एमएमए लढवय्ये सहभागी झाले होते.मिश्र मार्शल आर्ट एमएमएमध्ये बीड जिल्ह्याचे नाव लौकिक करणाऱ्या शेख रबी अहमदचे हे दुसरे राष्ट्रीय कांस्य पदक आहे. यापूर्वी त्याने पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रीय कांस्यपदक जिंकले होते, तर महाराष्ट्र राज्य स्तरावर त्याने नागपुरात सुवर्णपदक जिंकले होते.

ऑल इंडिया मिक्स्ड मार्शल आर्ट्स फेडरेशन अधिकृत राष्ट्रीय एलिट कॉम्बॅट २०२५ अजमेर राजस्थान मध्ये, तीन दिवसीय स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी पॉइंट टेबलनुसार बीड महाराष्ट्रच्या फायटर मिलिया सीनियर कॉलेजचा विद्यार्थी शेख रबी अहमद अब्दुल रहीम याला कांस्य पदक देण्यात आले. हरियाणा मेवातच्या ऋषीविरुद्धच्या अटीतटीच्या सामन्यात त्याने १० ते ९ गुण मिळवले.

